मौजे बालेवाडी, ता.हवेली, जि.पुणे येथील स.नं.४/१/१ मधील ० हे. ४० आर जागा महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. यांना कार्यालयासाठी व सी.एन.जी.स्टेशन उभारण्याकरीता प्रदान करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र.जमीन-३४१७/५३९/प्र.क्र.३६/ज-५
मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई ०३२.
दि. ०७/०२/२०१८

वाचा :-

१) महसूल व वन विभाग ज्ञापन क्र.जमीन-३४९१/२५९२/प्र.क्र.पु.७६२/९२/ज-५, दि.०२/०६/१९९३.

२) जिल्हाधिकारी, पुणे यांचे कार्यालयीन आदेश क्र.पमह/१६१०-तीन, दि.२१/०७/१९९४.

३) जिल्हाधिकारी, पुणे यांचे कार्यालयीन आदेश क्र.पीआरएच/शर्तभंग/एसआर/०१/२०१६, दि.२८/१२/२०१६.

४) विभागीय आयुक्त, पुणे यांचे पत्र क्र. मह/२/जमीन/पुणे/जागा मागणी/सीआर/३८/२०१७, दि.०७/०९/२०१७.

५) महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम, १९७१.

६) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. जमीन-०१/२०१४/प्र.क्र.०४/ज-१, दि.२०/०२/२०१६.

प्रस्तावना :-

महसूल व वन विभागाच्या संदर्भाधीन क्र. १ वरील दि.०२/०६/१९९३ रोजीच्या ज्ञापनान्वये तसेच त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, पुणे यांच्या संदर्भाधीन क्र.२ वरील दि.२१/०७/१९९४ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये प्राचार्य इन्स्टिटयुट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट ॲड केटरिंग टेक्नॉलॉजी, पुणे यांना मौजे बालेवाडी, ता.हवेली, जि.पुणे येथील स.नं.४/१ मधील ६ हे. ० आर जमीन प्रदान करण्यात आली होती. सदर जागा प्रदान आदेशातील अटी व शर्ती यांची पुर्तता न झाल्याने उक्त जागेच्या शर्तभंगाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांच्या संदर्भाधीन क्र.३ वरील दि.२८/१२/२०१६ रोजीच्या कार्यालयीन आदेशाद्वारे सदर जागा प्रतिग्रहीता, प्राचार्य इन्स्टिटयुट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट ॲड केटरिंग टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून काढून घेऊन सरकारजमा करण्याचे आदेश देण्यात आले होते. सद्य:स्थितीत सदर जागा प्रतिग्रहीता संस्था यांचेकडून काढून घेऊन शासनाच्या ताब्यात घेण्यात आली असून त्यानुषंगाने ७/१२ सदरी तसा अंमलही देण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. यांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने मौजे बालेवाडी, ता.हवेली, जि.पुणे येथील स.नं.४/१/१ मधील ३० मी. रुंद डी.पी.रस्त्याच्या

दक्षिणेकडील ० हे. ४० आर जागा महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. यांना कार्यालयासाठी व सी.एन.जी.स्टेशन उभारण्याकरीता प्रदान करण्याबाबत विभागीय आयुक्त, पुणे यांनी संदर्भाधीन क्र.४ वरील दि.०७/०९/२०१७ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय :-</u>

सदर प्रकरणी विभागीय आयुक्त, पुणे यांनी संदर्भाधीन क्र.४ वरील दि.०७/०९/२०१७ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम, १९७१ कलम ३१ मधील तरतूदीनुसार मौजे बालेवाडी, ता.हवेली, जि.पुणे येथील स.नं.४/१/१ मधील प्रस्तावित ३० मी. रुंद डी.पी.रस्त्याच्या दक्षिणेकडील ० हे. ४० आर जागा महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. यांना कार्यालयासाठी व सी.एन.जी.स्टेशन उभारण्याकरीता सन २०१७-१८ च्या शीघ्रसिध्दगणकानुसार कब्जेहक्काचे होणारे रु.१०,९४,८०,०००/- (रु.दहा कोटी चौ-यान्नव लक्ष ऐंशी हजार) इतके मुल्यांकन वसूल करण्याच्या तसेच खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून प्रदान करण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

<u>अटी व शर्ती:-</u>

१) महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. हा उपक्रम सदर जमीन भोगवटादार वर्ग-२ म्हणून धारण करील.

२) शासनाचे पूर्व परवानगीशिवाय सदर जमीन किंवा तिचा कोणताही भाग किंवा तिच्यातील कोणताही हितसंबंध विक्री / देणगी देऊन / अदलाबदल करुन / गहाण ठेऊन / पट्याने देऊन / खाजगी सार्वजनिक सहभाग तत्वावर किंवा बाहय यंत्रणेव्दारे किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत करता येणार नाही.

३) महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. यांना केंद्र व राज्य शासनाच्या सर्व संबंधित विभागांकडून जसे, पेट्रोलियम विभाग, पर्यावरण विभाग, प्रदूषण नियंत्रण विभाग, या विभागांकडून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेऊन सदर जागेचा वापर सुरु करणे बंधनकारक राहील.

४) सदर जागेवर करण्यात येणारे बांधकाम हे स्थानिक नियोजन विकास प्राधिकरणाच्या मान्यतेने तसेच विकास नियंत्रण नियमावलीमधील तरतूदीनुसार करणे बंधनकारक राहील.

५) महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. यांनी सदर जागेचा वापर करतेवेळी जागेलगतच्या गावठाण/रहिवास/व्यावसायिक वापराच्या अनुषंगाने त्या भागातील नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सुरक्षित अंतर (बफर झोन) ठेवणे आवश्यक राहील. तसेच त्यासंदर्भात केंद्रीय विस्फोटक विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील.

६) महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. यांनी अग्निशामक प्रतिबंधात्मक उपाययोजने अंतर्गत पाण्याचा स्त्रोत निर्माण करुन व अग्निशामक विभागाकडील ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करणे बंधनकारक राहील.

७) महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. यांनी प्रदान केलेल्या जागेचा वापर दोन वर्षाच्या आत सुरु करणे बंधनकारक राहील.

८) ज्या प्रयोजनासाठी जमीन मंजूर करण्यात आली आहे त्याच प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करण्यात यावा व प्रतिग्रहिता संस्थेकडून तशा प्रकारचे बंधपत्र घेण्यात यावे.

९) सदर जागेची मोजणी व डिमार्केशन महाराष्ट्र नॅचरल गॅस लि व पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी संयुक्तरित्या करुन घेणे बंधनकारक राहील.

१०) विषयांकित जमिनीचे उपरोल्लिखित मुल्यांकन महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. जमीन- ०१/२०१४/प्र.क्र.०४/ज-१, दि.२०/०२/२०१ ६ मधील तरतूदीनुसारच परिगणित करण्यात आले असल्याचे तसेच सदर मुल्यांकन अचूक असल्याचे जिल्हाधिकारी, पुणे यांनी प्रमाणित करावे.

११) मंजूर आदेशातील अटींचा भंग झाल्यास जमीन सरकार जमा करण्यास पात्र राहील व प्रतिग्रहिता संस्थेस मोबदला मागण्याचा हक्क राहणार नाही.

१२) जिल्हाधिकारी, पुणे यांनी जमीन मंजूरीचे आदेश काढण्यापूर्वी शासनाच्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबत प्रतिग्रहिता संस्थेकडून लेखी अभिप्रमाणित हमीपत्र घ्यावे. तसेच जमिनीचा ताबा देताना विहित नमुन्यातील सनद निष्पादित करण्याची कार्यवाही करावी.

१३) जिल्हाधिकारी, पुणे यांना योग्य वाटतील अशा अन्य अटी व शर्ती.

सदर शासन निर्णय नगर विकास विभागाच्या सहमतीने तसेच वित्त विभागाने त्यांच्या अनौ.सं.क्र. ४०० /व्यय-९, दि.२२/१२/२०१७ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला असून त्यांचा संकेतांक क्र २०१८०२०७१६३५२३४११९ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने सांक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Pratap Sampatrao Madkar

Digitally signed by Pratap Sampatrao Madkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forests Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=691ba5cde50be5ad4d70b5410e666a3f513b4fd3934f0227b3aab4ff49ee9941, cn=Pratap Sampatrao Madkar
Date: 2018.02.07 16:39:24 +05'30'

(प्रताप सं. माडकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अप्पर मुख्य सचिव, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई
३) मा. विरोधी पक्ष नेता, विधान सभा/परिषद, विधानभवन, मुंबई.
४) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) प्रधान सचिव (नगर विकास), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) विभागीय आयुक्त, पुणे.
१०) आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे.

११) जिल्हाधिकारी, पुणे.
१२) मा.महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर (१/२).
१३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. पुणे.
१४) वित्त विभाग (का-व्यय ९), नगर विकास विभाग (का-१३), मंत्रालय, मुंबई.
१५) निवडनस्ती, कार्यासन ज-५ , महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.